**Government of Maharashtra**

School Education and Sports Department,

Ministry (Extension), Room No. 447, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mumbai-400032.

Email ID:- sm2.sesd-mh@gov.in

---

No.:-SFS-1024/P.No.161/SM-2 Dt-26th June, 2025

## Approval Letter

To.

President/Secretary,

Nirmala Memorial Foundation, Malad, Mumbai.

Sub- Approval letter for starting a new school on self-financed basis under the Maharashtra Self-Financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012 to Northstar International Academy, Group No. 720, 721, 723, 730/1/B and 733, Wagholi, Pune, run by Nirmala Memorial Foundation, Malad, Mumbai.

Ref- Letter of Intent No. SFS-1024/ P.No.161/SM-2, dated 11/03/2024

Under the Maharashtra Self-Aided Schools (Establishment and Regulation) Act, 2012, Northstar International Academy, Group No. 720, 721, 723, 730/1/B and 733, Wagholi, Pune, run by Nirmala Memorial Foundation, Malad, Mumbai, had submitted an application for starting a new school on self-aided basis from primary to higher secondary (Class 1 to 12, all branches, English medium, CBSE).

ATTESTED TRUE COPY

NOTARY A. R. SURVE DIST. MUMBAI REGN. No. 16353 Exp. 29/01/2030 GOVERNMENT OF INDIA

A. R. SURVE
ADVOCATE & NOTARY
GOVT. OF INDIA
REG. NO. 16353

18 JUL 2025

2. In connection with your application, a letter of intent was given with reference to the terms and conditions for starting a new school from Primary to Higher Secondary (Class 1 to Class 12, all branches, English medium, CBSE) on self-financed basis from the academic year 2024-2025 under the Maharashtra Self-Aided Schools (Establishment and Regulation) Act, 2012 and the Maharashtra Self-Aided Schools (Establishment and Regulation) Rules, 2020 at Northstar International Academy, Group No. 720, 721, 723, 730/1/B and 733, Wagholi, Pune, run by Nirmala Memorial Foundation, Malad, Mumbai, on self-financed basis. However, while submitting the proposal for the letter of approval, the institution had submitted a partial occupancy certificate dated 06.05.2025 regarding the construction of the school building. Considering this matter, it was advised to submit the full occupancy certificate within 1 year for the safety of the students and to submit an undertaking that there will be no hindrance to the safety of the students. Accordingly, the institution has given an undertaking through an affidavit to submit the full occupancy certificate of the school building to the Education Department within six months vide letter dated 19.06.2025.

Considering this matter, Northstar International Academy, Group No. 720, 721, 723, 730/1/B and 733, Wagholi, Pune, run by Nirmala Memorial Foundation, Malad, Mumbai, has now opened for classes from Primary to Higher Secondary (Class 1 to Class 10, English Medium, CBSE) for the academic year 2025-26. The approval letter is being issued subject to the following terms and conditions. Also, if the institution submits the completion and occupancy

Right of Children to Free and Compulsory Education Rules, 2011 and the directions given by the Government under this Act or the standards or criteria or terms and conditions specified by the Government from time to time.

2) It is mandatory for the registered institution or trust or company to comply with all the norms, terms and conditions prescribed by the Maharashtra Self-Aided Schools (Establishment and Regulation) Act, 2012 and the directions issued by the Government under this Act or the norms or terms and conditions specified by the Government from time to time.

3) It is mandatory for school managements interested in affiliation to boards like C.B.S.E. or C.I.S.C.E. or C.A.I.E. or I.V. etc. to obtain a no-objection certificate from the Government, as per the directions issued by the Government from time to time.

4) The school management will inform the Education Officer of the concerned district before the commencement of the academic year approved by the government.

NOTARY * GOVERNMENT OF INDIA * A.R. SURVE DIST. MUMBAI REGN. No. 16353 Exp. 28/01/2030

students. Accordingly, the institution has given an undertaking through an affidavit to submit the full occupancy certificate of the school building to the Education Department within six months vide letter dated 19.06.2025.

Considering this matter, Northstar International Academy, Group No. 720, 721, 723, 730/1/B and 733, Wagholi, Pune, run by Nirmala Memorial Foundation, Malad, Mumbai, has now opened for classes from Primary to Higher Secondary (Class 1 to Class 10, English Medium, CBSE) for the academic year 2025-26. The approval letter is being issued subject to the following terms and conditions. Also, if the institution submits the completion and occupancy certificate regarding the construction of the school building within one year, a separate decision will be taken regarding granting approval for Higher Secondary (Class 11 to Class 12).

**3. Terms and Conditions:-**

1) The proposed school shall comply with all the standards, terms and conditions prescribed by the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 and the Maharashtra

NOTARY
A. R. SURVE
DIST. MUMBAI
REGN. No. 18353
Exp. 29/01/2030
GOVERNMENT OF INDIA

5) Permission granted under the provisions of this Act to establish a new school or to upgrade the status of a school shall be for the same academic year for which it is granted.

6) If the school management fails to start the school within 18 months, the recognition letter given will be cancelled.

7) The school management cannot change the approved medium of education or the location of the school in the future without the permission of the government.

8) If the school management has established a school at a location other than the one approved by the government, the permission of that school will be cancelled.

9) It has been provided that the recruitment of teachers and non-teaching staff in self-financed schools should be done in accordance with the prevailing rules and regulations of the Government.

10) While filling district-wise information, the school to which permission has been given will

NOTARY
A. R. SURVE
DIST. MUMBAI
REGN. No. 16353
Exp. 20/01/2030
GOVERNMENT OF INDIA

fill in the information as 'Self-financed School' as a separate category and will obtain UDISE number. In this regard, State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai has been declared as the Nodal Officer.

11) The school management will put up a sign saying "Self-financed Permitted School" at the entrance of the school premises.

12) The State Government may, at any time, cancel the certificate of recognition granted on the ground of violation of any of the provisions of this Act or the rules made thereunder or failure to comply with any directions given under the Act or with the standards or standards specified by the Government from time to time or with the terms and conditions.

13) It will be mandatory for the school to strictly implement the comprehensive instructions given regarding the measures to be taken for the safety and security of the students in the school as per the Government Decision dated 13th May 2025.

NOTARY GOVERNMENT OF INDIA A. R. SURVE DIST. MUMBAI REGN. NO. 16353 Exp. 29/01/2030

14) Since a partial occupancy certificate has been submitted regarding the construction of the school building, no construction should be carried out in the building while the school is in session for the safety of the students.

15) Students should not enter areas where school building construction is underway. For this, it will be mandatory to make necessary security provisions (barricades, notice boards, appointment of security guards, etc.).

16) Any other conditions as may be specified by the Government.

(Pramod Kadam)
Officer, Government of Maharashtra

copy-

1. Commissioner (Education), Maharashtra State, Pune.

2. State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai.

3. Director of Education (Secondary Higher Secondary), Maharashtra State, Pune.

NOTARY
A. R. SURVE
DIST. MUMBAI
REGN. No. 16353
Exp. 29/01/2030
GOVERNMENT OF INDIA

4. Director of Education (Primary), Maharashtra State, Pune,

5. Deputy Director of Divisional Education, Pune Division, Pune

6. Education Officer (Primary/Secondary), District Pune.

7. Election (SM-2) (161/2024)

NOTARY GOVERNMENT OF INDIA
A.R. SURVE
DIST. MUMBAI
REGN No. 16353
EXP. 28/01/2030

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४४७,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
Email ID:- sm2.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२४/प्र.क्र.१६१/एसएम-२ दिनांक-२६ जून, २०२५

**मान्यता पत्र**

**प्रति,**
**अध्यक्ष / सचिव,**
**निर्मला मेमोरिअल फौंडेशन, मालाड, मुंबई.**

**विषय-** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी मान्यता पत्र **निर्मला मेमोरिअल फौंडेशन, मालाड, मुंबई संचलित नॉर्थस्टार इंटरनॅशनल अ‍ॅकेडमी, गट क्र. ७२०, ७२१, ७२३, ७३०/१/ब व ७३३, वाघोली, पुणे.**

**संदर्भ-** इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२४/प्र.क्र.१६१/एसएम-२, दिनांक ११/०३/२०२४

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **निर्मला मेमोरिअल फौंडेशन, मालाड, मुंबई संचलित नॉर्थस्टार इंटरनॅशनल अ‍ॅकेडमी, गट क्र. ७२०, ७२१, ७२३, ७३०/१/ब व ७३३, वाघोली, पुणे या प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ.१ ली ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.)** ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरू करण्याकरीता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून **निर्मला मेमोरिअल फौंडेशन, मालाड, मुंबई संचलित नॉर्थस्टार इंटरनॅशनल अ‍ॅकेडमी, गट क्र. ७२०, ७२१, ७२३, ७३०/१/ब व ७३३, वाघोली, पुणे या प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ.१ ली ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.)** ही नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर सुरू करण्यासाठी, अटीं व शर्तीसह संदर्भाधिन इरादा पत्र दिले होते. तथापि, मान्यता पत्राचा प्रस्ताव सादर करताना संस्थेने शाळेच्या इमारत बांधकाम बाबत दि.०६.०५.२०२५ रोजीचे अंशतः भोगवटा प्रमाणपत्र सादर केले होते. ही बाब विचारात घेता विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पूर्णतः भोगवटा प्रमाणपत्र १ वर्षाच्या आत सादर करणे व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेस कोणतीही बाधा येणार नाही यानुषंगाने हमीपत्र सादर करणेबाबत सूचित करण्यात आले होते. त्यास अनुसरून संस्थेने दि.१९.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये शाळेच्या इमारतीचे पूर्णतः भोगवटा प्रमाणपत्र सहा महिन्यांच्या आत शिक्षण विभागात सादर करणेची हमी शपथपत्राद्वारे दिली आहे.

सदर बाब विचारात घेता **निर्मला मेमोरिअल फौंडेशन, मालाड, मुंबई संचलित नॉर्थस्टार इंटरनॅशनल अ‍ॅकेडमी, गट क्र. ७२०, ७२१, ७२३, ७३०/१/ब व ७३३, वाघोली, पुणे या प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ.१ ली ते इ.१० वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.)** करीता आता शैक्षणिक वर्ष २०२५-२६

पासून खालील अटीं व शर्तींच्या अधीन राहून मान्यता पत्र देण्यात येत आहे. तसेच संस्थेने एक वर्षाच्या आत शाळेच्या इमारत बांधकाम बाबत पूर्णत्व भोगवटा प्रमाणपत्र सादर केल्यास उच्च माध्यमिक (इ.११ वी ते इ.१२ वी) करीता मान्यता देण्याबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.

३. **अटी व शर्ती:-**

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयंअर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

१३) शासन निर्णय दि.१३ मे २०२५ अन्वये शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात दिलेल्या सर्वसमावेशक सूचनांची शाळेने काटेकोर अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील.

१४) शाळेच्या इमारत बांधकामबाबत अंशतः भोगवटा प्रमाणपत्र सादर केले असल्याने विद्यार्थी सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळा सुरू असताना इमारतीमध्ये कोणतेही बांधकाम करू नये.

१५) ज्या ठिकाणी शाळेच्या इमारतीचे बांधकाम सुरू आहे, अशा ठिकाणी विद्यार्थ्यांना प्रवेश करू नये, यासाठी आवश्यक ती सुरक्षात्मक तरतूद (बॅरिकेट्स, सूचनाफलक, सुरक्षारक्षकाची नेमणूक इत्यादी) करणे बंधनकारक राहील.

१६) शासनाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा इतर कोणत्याही शर्ती.

PRAMOD VITHOBA KADAM

Digitally signed by PRAMOD VITHOBA KADAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT,
2.5.4.20=f82b9e0b005ed06987e1ae26683203c8f241022e0aad6b1c827af561b72f83bb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF4901BED6A48EE0ED963C63F1B0172A4718894A400C0988FBB3381DB913696F, cn=PRAMOD VITHOBA KADAM
Date: 2025.06.26 17:50:40 +05'30'

**(प्रमोद कदम)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि.प.पुणे.
७. निवडनस्ती (एसएम-२)(१६१/२०२४)